
सुंबरान मांडलं
आनंद विंगकर

सुंबरान मांडलं



सुंबरान मांडलं

आनंद विंगकर

सुंबरान मांडलं: आनंद विंगकर
संपादक: विनया मालती हरी

जवाआं/म ८०
प्रकाशन: ऑगस्ट २००९

देणगी मूल्य: १५ रुपये

विशेष आभार:
मा.रामराव पवार, मा.अरूण भालेकर,
मा.सुगंध कांबळे, मा.गणपत कोकरे,
मा.राम साळुंखे, मा.प्रशांत पवार.

प्रकाशक: परेश ज.म., सचिव
भारत ज्ञान विज्ञान समुदाय(महाराष्ट्र)
९,आधार अपार्टमेंट, ३०५, नारायण पेठ,
पुणे ४११०३०/फोन: ०२०-२४४३४१३३
ईमेल:mahabgvs@gmail.com

मुद्रण स्थळ :
नर्मदा ऑफसेट प्रिंटीग
नारायण पेठ, पुणे ३०

अक्षर जुळणी: राम शिंदे



'नव्या युगाचं सुंबरान'

डॉ. तारा भवाळकर

घरात येणाऱ्या एका नियतकालिकात नुकतीच एक कविता वाचली होती आणि तेव्हा ती मनाला खूपच भिडली होती. कविता आवडणं आणि त्यावर काही लिहिणं ही दोन टोकं.

सगळ्या आदिवासी-आदिम संस्कृती या प्रकृतिसंवादी संस्कृती. महानगरी अत्याधुनिक जगण्यापासून जसजसे भूतकाळाकडे जावे, तसतसे हे प्रकृतिसंवादित्त्व गाढ होत जाते. गूढही होत जाते. प्रकृति, अवघी पंचतत्त्वांची सृष्टी अधिकाधिक निर्लेप 'कोरी' होत भेटत राहते आणि आधुनिकतेकडे यावे तसे प्रकृतिसंवादित्त्व लोपत तर जातेच; पण ते भ्रष्ट, भ्रष्टतम, उजाड-ओसाड होत जाते.

अगदी कृषी संस्कृतीच्या यंत्रपूर्व अवस्थेतही प्रकृतीची गाढता, गूढता आणि गारवा जाणवत राहतो. अशा प्रकृतीच्या हातात हात घालून नांदणाऱ्या माणसांची सगळी जगण्याची रीतच पंचतत्त्वाचा एक भाग होऊन राहिलेली दिसते. येथे 'मी''माझे' काहीच नसते-सगळे 'आपले' असते. एकात्म असते. येथले देवही माणसासारखे आणि माणसेही येथल्या देवासारखीच! सगळी प्रकृतीची शुद्ध रूपे! म्हणून शेती संस्कृतीतली अनक्षर पण गूढ सृष्टीच्या महान ग्रंथाची भाष्यकार स्त्री जात्यावर दळण दळता दळता म्हणते,

"ज्याला नाही लेक, त्याने तुळस लावावी।
लगीन लावून, देव करावे जावई।।"

ही सहज निर्व्याजता मग आणखी थोडे भूतकाळात शिरले की अधिक दाट होत जाते. पशुपालन अवस्थेतल्या भटक्या फिरस्त्या जीवनातला माणूसही देवाचं 'स्मरण' करताना, 'सुंबरान मांडताना' सहजच म्हणतो,

"सुंबरान मांडिलं गा, बिरू माझ्या देवाला।
धरतरी मातेला गा, मेघराया पित्याला।
चांद-सूर्या बंधूचं गा, किसना-कोयना भैनीला।।"

आधुनिक जगाचं सुंबरान सांगणाऱ्या कवी आनंद विंगकर यांचं 'सुंबरान' वाचताना "बिना काना-मात्रा-वेलांटी शिवायच्या धनगराचे" हे 'सुंबरान' आठवले. या धनगराचा 'बिरोबा'-विरोबा-'वीर'देव हाही सृष्टिमातेचे अपत्य! 'कोऱ्या' भूमीत जन्माला आलेले, वाढलेले आणि महत्त्वाचे म्हणजे अवघ्या सृष्टीचे रक्षण करणारे! एका अर्थाने प्रत्येक आदिम, भटका हा बिरोबा-विरोबाच होता.

भारतीय समाज मोठा मजेशीर आहे. आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या साह्याने साक्षात् चंद्र-सूर्याला पालाण घालणाऱ्यांबरोबरच येथे अजूनही "चंद्र-सूर्याचे सुंबरान" भावभक्तीने गाणाऱ्या जवळ-जवळ आदिमतेच्या सर्व आंतरबाह्य वैशिष्ट्यांसह जगणारा समाजही आहे.

कवी हा तुमचा-माझा प्रतिनिधी! अत्र ना परत्र असा अधांतरलेला. आधुनिक विज्ञानयुगाने दिलेल्या शरीराच्या सुखसोयीत, स्वास्थ्यात गुरफटताना संकुचित होत होत 'मी'च्या आत्मकेंद्री चिमटीत पिचलेला! अशा वेळी याचि देही याचि डोळा नखशिखान्त प्राकृतिक विभूतीच्या दर्शनाने विस्मित होणारा, अंतर्मुख होणारा, हळहळणारा! ही प्राकृतिक विभूती भेटते एका धनगराच्या रूपात. शहरी तुच्छ आत्मकेंद्री नजरेला जेव्हा ही विभूती विशाल करीत नेते, तेव्हा तो शहरी कवी चक्रावत जातो.

'पर्यावरण रक्षण' सारखे खडखडीत शब्द वापरून शाब्दिक पसारे मांडीत असतानाच हवा, पाणी, वनस्पती, सागर, पशु-पक्षी सगळ्यांच्याच जिवावर उठलेले आम्ही एकीकडे आणि जळणासाठी एखादी वाळलेली झाडाची फांदी तोडताना झाडाची किंवा वाहत्या पाण्याला पाय लावताना जलाशयाची हात जोडून प्रथम क्षमा

मागणारा दर्शनी ओबडधोबड असलेला खरा प्रकृतिपुत्र धनगर दुसरीकडे! हा धनगरच त्याला सृष्टीच्या, जीवनाच्या नव्या लिपीची तोंडओळख करून देतो आणि मग सृष्टिवेदाचे, जीवनाच्या अस्तित्त्वग्रंथाचे एकेक सूत्र समजावीत जातो. अर्थात् हे समजून घेणाराही तेवढाच संवेदनशील असावा लागतो, हे आहेच! आपल्या आधुनिकतेच्या 'संस्कृती'चाच असंस्कृतपणा मग उमजत जातो.

कोणत्याही बाह्य साधनांशिवाय कळणारी अवघ्या सृष्टीचीच एक भाषा असते, आतून उमलून आलेली. याचेही ज्ञान होते. ही भाषा या प्रकृतिपुत्राला पशुपक्ष्यांची भाषा शिकवते, वारा-पाण्याची दिशा दाखवते, झाडा-मुळांचे गुणधर्म दाखवते, अवघ्या संस्कृतीच्या मुळाशीच ती घेऊन जाते. या भटक्या फिरस्त्या समाजांनी डोंगरदऱ्यात, राना-शेतात आणि माळरानात नित्य वाटा वर्षानुवर्षे पायाखाली घातल्या आणि त्यांच्या या पाऊलवाटांनी आजच्या सडका आणि घाटमाथ्यावरच्या वळणा-वाकणांचे "रोड मॅप" बनवले होते, हेही कळते, येथे प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबींची आठवण येते. अश्मयुगापासून तुडवीत आलेल्या या मार्गांचा मागोवा त्यांनी घेतला आह; तो आजच्या वाटांचे पूर्वरूप समजून घेण्यासाठी!

अशा प्रकृतिपुत्राच्या, एका धनगराच्या सहवासाचा योगायोगाने लाभ घडलेल्या कवीला मग एकदम साक्षात्कारी भान आले आणि माणसाचा आजवर प्रतिपाळ कलेल्या या सृष्टीला आता आधुनिक शहाणा म्हणवणारा माणूसच एखाद्या वैऱ्यासारखा आंधळ्या क्रूरपणाने कसा नष्ट-भ्रष्ट करीत चालला आहे, याचे स्मरण करून देण्यासाठी त्याला हे 'नव्या युगाचे सुंबरान' मांडावेसे वाटले. आता मात्र या शहाण्या म्हणवणाऱ्या (?) माणसालाच बिरोबा-विरोबा व्हावे लागणार आहे, नव्या वैऱ्याचा नायनाट करण्यासाठी!

त्या आदिम बिरोबाने राखलेल्या या प्रकृतीची पूर्ण 'राख' करायची नसेल तर या नव्या युगाचं सुंबरान केवळ शब्दात मांडून भागणार नाही. कृतीत आणावं लागेल. त्यासाठी ही कविता वाचून ज्याला त्याला आपआपल्या परीने प्रथम समजून घ्यावी लागेल.

* * *



सुंबरान मांडलं

सायाळशिंगे परिसरातील गणपा जानकर
विटा खानापूरच्या स्टँडवर
पेपर छापायच्या कारखान्याची चौकशी करताना भेटला.
दिसायला जवळपास गंधर्वासारखा देखणा
तो हून स्वत: बोलला, नाहीतर दुर्लक्षित झाला असता
फिरस्ता.
'तीन कोकरं देणाऱ्या मेंढीची एक जात'
अशा एका बातमीचा होता मथळा.

: कारखाना नाही प्रेस म्हणतात त्याला.
वाचता येत नाही कां आपणाला?
तो सरळ येऊन बाजूलाच
'दो बिघा'तील बलराज सहानी सारखा चवड्यावर येऊन बसला.
'आई बा वाड्यावर असताना
रात्री डोळा लागायच्या येळेला माझा जन्म झाला
तेव्हा जे डोळ्यांत आभाळ उतरलेलं
त्यामुळे बघताना माझ्या डोळ्यांचा ठाव लागत नाही कुणालाच
काळोखातलंच नव्हे माणसाच्या मनातलं सुद्धा वाचत येतं मला-
तुम्ही शिक्षणाविषयी विचारीत होता
नेणता असताना वर्षातले चार सहा महिने मेंढरापाठी
चवथी पावतूर सलग सालभर एखाद्या इयत्तेचा अभ्यास नाही झाला

सातवीच्या परीक्षेला सरळ सेंटरवरच पेपराअगोदर मला पोहोचता केला
नंतर स्वत:च शिकलो आहे मी माझी शाळा.
उसंतीत जोडीदारासारखे एखादे पुस्तक घेऊन बसावे हातात
तर दावणीच्या जनावरासारखे काम वाट पहायचे रानात
म्हणून फुरसतीने गुंठाभर वाचन नाही कधी करता आले
परसाकडे बसताना पुढ्यातील अक्षरांचा कागद
मी अधाशासारखा आहे वाचलेला
आणि चार शब्द वाचल्याबिगर झोपही लागत नाही मला'.

'उशिरा फुटून फुललेली, वेचावीत कपाशीची पांढरी बोंडं
भुकेल्या पोटी सरळतांना उघड्या पडाव्यात भुयमुगाच्या शेंगा
काट्याच्या फडात उमलून आलेलं दिसावे
असंख्य पाकळ्यांचे दुर्मिळ निवडुंगाचे फूल
वयाने केस पिकल्या म्हातारीच्या मुखातून ऐकावा
लाख मोलाचा शब्द
या सर्वांतून प्रतीत होतं माझ्यासाठी ज्ञान'

'जेवणाची वाट पहात'
कलमलून
वाड्यावर एकटेच पहुडलो असता रात्री
दूर आकाशात प्रकाशत असतो केवळ आपल्याचसाठी
एखादा दूरस्थ तारा
लखकन् डोक्यात पडतो उजेड
आपण एकटेच नाही या विश्वात
माझेच तर आहे हे सारे
ही पृथ्वी,
आणि क्षणात आपल्याच आभाळा येवढ्या काळजाची येते
प्रचिती.
याला काय म्हणतात तुमच्या भाषेत,
ज्ञान की दृष्टांत?
तसा माझा जीवसृष्टी अन् मानवाविषयी आस्थेचा अभ्यास
येरव्ही भावाच्या पोराचा जो दुस्वास करतो

तो माणूस स्वार्थी.'

नाहीतर कमालीचा आत्मकेंद्री मी अन् माझे सहकारी
शिक्षणाने किती रुंदावल्या आमच्या कक्षा,
स्वत: पलिकडचे किती विस्तारले अवकाश?
आणि समोरचा हा खेडवळ अनोळखी अवलिया
'हे विश्वची माझे घर'ची सांगतोय वार्ता

बदली होताना एक बँकवाला मित्र म्हणाला,
गावात चाललाहेस, सांभाळून!
बेरकी असतात लोक, मधाळ बोलतात,
आणि मिळेल त्या ठिकाणी कोपराने खांदतात.
मुख्य म्हणजे अंतर ठेवून रहा
आणि आपले ड्रॉबॅक्स दाखवू नको कुणालाच.

: इथे या भागात नोकरी करतोय
जेवण आणि राहाण्याचे जमले नाही कुठेच
म्हणून असा येऊन जाऊन करतोय
त्यातून हा भाग थोडा मागासलेलाच.
वेळेवर बस मिळत नाही, उन्हाळ्यात पाणी मिळण्याची ददात,
माणसं राहतात कशी इथं?
माझ्या कडवट प्रतिक्रियेवर तो थोडा वरमलाच.

:'म्हणतात त्यात काही खोटं नाही राव;
खराय तसा हा भूभाग थोडा मागासलेलाच,
पण तुमच्या लक्षात कसं येत नाही
जमिनीच्या प्रतवारीवरच आपल्या जातीच्या झाल्याहेत विभागण्या
डोंगर दऱ्यात गवळी, धनगर, कुपोषीत, कातकरी आदिवासी
अशा माळावर, वड्या वगळीच्या आधारावर
तग धरून उभ्या, माझ्या उपेक्षित ओबीसी बीसी एनटी.
उच्चभ्रू शहरं, नद्यांच्या दुवाबात तुमच्या अलवार श्रेष्ठ जाती'

प्रतिवादाची कसली संधी न देताच
त्याने माझा पहिल्यांदाच असा पट काढला.
क्षणात तो आपल्या खिलाडू समेवर येत
खळखळणाऱ्या झऱ्यासारखा बोलत राहिला
नोकरीचे कोणते गाव म्हणालात?
…………, मी
'म्हणजे राजे हो आमच्याच गावात
तसे गावात रहात नाही आम्ही
गावाच्या बाहेर मावळतीला जांभूळवड्याच्या वस्तीवर
बक्कळ जागा आहे आपल्यात,
ऐसपैस
घरात एक माच, सोप्यात झोपाळा, खुशाल पाय मोकळे सोडा
झोपेत कोणी तरी झोका देतोय असा होतो भास
मी क्वचित झोपतो त्यावर
जागे होऊन उठावे तर हलत असतो अधांतर
आणि माझे तर जमिनीशी नाते असे बळकट.

सावलीला गुळभेंडी लिंबाची झाडं
गारवा तर असा
'मायणी'च्या बगळ्यांनी रात्री इथे वस्तीला यावे.

उन्हाळ्यात अंगणात निवास इव्हॉप लागते
खाली जमीन वर आकाश
मनात आले तर खेळ म्हणून मोजीत रहावे आभाळाचे तारे
बाकी कशाची नाही कमतरता
तेवढं पाणी सांभाळून वापरा.
मटनाची काय चव- अशी मटकीची उसळ, बाजरीची भाकर
पंधरा तीन आठवड्यात वानगीचा किराणा म्हणून शेळी-मेंढीचा खरवस
तसे सगळे दिवस सारखे नसतात, सगळ्या रात्री
एखादेवेळी तांब्याभर पाण्यावर रात ढकलावी लागते
उभ्या गावात शे-पाचशेची नड होत नसते.
'तसे मूळचे आम्ही भटके

त्यात पैसा-पाण्याने इदमाने आमची वागणूकही थोडी अमगळ गबाळ ग्रंथी
पटत असेल तर व्हय म्हणा.
उद्या काय असेल तो घेऊन या तुमचा बाड बिस्तारा
तोवर मी घरात सारवून घ्यायला लावतो.'

:नाही म्हटलं, आम्ही बौद्ध
कुणाला चालते न चालते सुरूवातीलाच सांगितलेले बरं.

'वागण्यात चांगले शिकले सवरलेले
तुम्ही कोण, कुठले म्हणून कां आम्ही विचारले?
आपले संस्कार तरी कसले,
तहानल्या वाटसरुला पितानाच विचारतो आपण त्याची जात
अशाने पाणी दाटतं छाताडात
भंडाऱ्यावरून ओळखले असेल
काना मात्रा उकार वेलांटी शिवायचे आम्ही धनगर'
म्हणून हसला.

मला एस.टी.मिळेतोवर स्टँडवरच आम्ही बसून काढली ती रात्र
अशा तऱ्हेनं सुरू झाला माझा त्याच्या सोबतचा संवाद.
या दीड-दोन वर्षात खूप काही शिकलो
निसर्गात असं मोकळं ढाकळं जगताना
गळून गेलेत माझे मध्यमवर्गीय नॉर्म्स
मुख्य म्हणजे,
चोरावी लागली नाही मला माझी जात.
वावरताना कुठेच वाढले नाही अंतर
आली नाही परात्मता,
अवहेलनेच्या ओरखड्याशिवाय
पाण्यासारखा पारदर्शी राहिला माझा आत्मा.

एखादा माणूस दिवस-रात्र राबून
किती करीत असेल काम - याला काही मर्यादा?
निद्रानाशाने मी त्रस्त.

साडे बारा एकला कसाबसा लागणारा डोळा
तर पहाटे पाचलाच संपायची त्याची रात्र,
आणि अकरानंतरही तसाच सुरू दिवस.
कामाच्या किती असाव्यात तऱ्हा?
भाषेत अजून नावे देता आली नाहीत असे एकेक प्रकार
खिशात हात घालून मी हे सारे अनुभवले
– नुसतेच बैलासारखे ध्वॉन घालून काम
म्हणून मध्येच प्रश्न विचारून केले त्याला बेजार
उद्देश येवढाच की,
त्याच्या कष्टाच्या अनुभवातून उजागर झालेली भाषा
ऐकता यावी मला.

ताऱ्यांची वाट त्याला तोंडपाठ
राखणीवर रात्र सरताना
डोळ्यातच पहाटेला कसे कलंडते आकाश,
कधी फडफडतो रातवा
वाऱ्याच्या बदलत्या प्रवाहातून अचूक कळते वेळ
त्याच्या केवळ अंदाजाने आंब्यांना येतो मोहोर
मोगरीच्या फुलासारखी जेव्हा शुभ्र फुलते करवंद
त्यावेळी पाऊस जवळ आलेला असतो
तो म्हणतो,
'निसर्गाची सुद्धा एक भाषा असते आपली,
जाणणाऱ्यालाच ती समजते.
वानरांचे केकाटणे, मोरांचे केकारव,
मध्यरात्री झाडावर कावळ्यांची कावकाव,
एकदम सर्व कुत्र्यांचे अकस्मिक रडणे
याला काही एक कारणं असतात.
आपण चिडतो दगड उचलतो
जशी अवघ्या परिसराची मालकी तुम्हाला कोणी जागिरी म्हणून दिलेली?
ओल्या काठीशिवाय, फक्त स्पर्शातून,
मातीच्या उदरातील खळाळत्या पाण्याचे आवाज ऐकू येतात मला.
केवळ वासावरून सापाचा माग काढता येतो.

म्हणून मी शिकाऱ्याला निरपराध प्राण्यांची दाखवीत नाही बिळं
आणि कुठल्या काळातील
पृथ्वीने साठवून ठेवलेले पाणी अथवा ते पेट्रोल
का म्हणून आपण त्याची अशी नासधूस करावी?
बापजाद्यांनी तशी ही पृथ्वी आपणास आंदेलीवर दिलेली.
तिचे संगोपन करीतच ती
मुद्देमालासह येणाऱ्या पिढ्यांना सोपवायचीय.
म्हणून शेंडा शाबूत ठेवून झाड सवाळतो मी
वाळक्या पाचोळ्यावर पाय ठेवताना विचार करतो
कोणी पाहिला आहे म्हसोबा अन् सातीआसरा
जीवाचा वास सर्वत्र.
इथून तिथून सारे रान, भारलेलं असतं शिवार
प्रत्येकालाच आहे जगण्याचा अधिकार.'
मेंढरापाठी अथक चालणाऱ्या पायासारखा मी
खूप भटकलो त्याच्या सोबत
पाण्याशिवाय धुंडाळलाय बंजार प्रदेश
अंघोळी शिवाय घामेजलेत तसेच सारे दिवस.
वाऱ्याकडे पाठ करून पेटवली शेकोटी,
अर्धी कच्ची शेकून घेतली रात्रीची भाकरी.
जोंधळ्याच्या पाण्यावर सोबतीला असताना त्याने मला दाखवले,
मध्यरात्री प्रवासाला निघालेले परदेशी पक्षी.
चांदण्यात अगदी जवळून अनुभवलीय ती
प्रकाश सावल्यांची विरत जाणारी लयबद्ध नक्षी.

तो स्वत:शीच म्हणाला,
'स्थलांतरीत पाखरांनंतर मीच धुंडाळून काढलीय
ही नवखंड पृथ्वी
एखादा मेंढपाळ आयुष्यभर मेंढरापाठी किती तुडवित असेल रान
याचा काही अंदाज?
डोंगर कपारीत जिथे माझी पावले उमटली तिथून सुरू झाली वाट
आणि निर्माण झालेत घाट.
मीच सर्व प्रथम शेळ्या, मेंढ्या, घोडा आणि कुत्र्याला

आणले माणसात.’
दाखवून दिले, जिथे शेरडं आणि माकडं लावीत नसतात तोंड
हे सर्व माणसाच्या खाण्यासाठी असते अयोग्य.
झाडाझुडपांतून औषधं शोधण्याची माझी कष्टप्रद साधना
हीच खरेतर आयुर्वेदाची आहे पूर्वपीठिका
नंतर सावकाशीने शोधून काढल्यात प्रमाण आणि मात्रा.

आर्थिक अथवा सामाजिक
माझा बहुतांश समाज अज्ञान आणि दारिद्र्यात.
आधीच योग्य उमेदवार न मिळाल्याच्या कांगाव्यात
माझ्या उमेदीच्या उभारीची लावली जाते वासलात.
तरीही त्यांचे रिझर्वेशन विरोधातील आकांडतांडव,
येत नाही माझ्या आकलनात.
मग वर्णाने कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ
माझ्या सारख्याच इतर गरिबाचा मी का करावा दुस्वास?
माझे तर मागणे सर्वांनाच मिळूद्यात काम.
हे सर्व सांगताना चेहऱ्यावर कसलाही नव्हता उद्वेग अथवा संताप
शेवटी स्वत:च आपले हात निरखीत मनाशी पुटपुटला,
‘आमच्यासाठी हक्काचे म्हणून उरते काय
तर आपल्याच कष्टावरचा अढळ विश्वास!’

आणि एकदम माझ्या लक्षात यायला लागते
खरेच का या विषयावर आपण बोलायचे नाही?
मार्केट, गोदाम अन् लोखंडी जथ्यातील माथाडे,
कचऱ्याच्या गाड्यांवर रस्ते वा संडास साफ करणारे मेहतर,
बैलासारखे खांद्यांवर सोल टाकून गर्दीत चढावर गाडी ओढणारे माथाडी कामगार,
मानेत हूक अडकावून
पृथ्वीच आपल्या पाठीवर घेण्यासाठीचे तत्पर हमाल!
बसचा प्रवास करताना खिडकीतून
या सर्वांना ‘माणूस’ म्हणून
आपण साधी वागणूक तरी दिली आहे का?
का हा आपला नाही प्रांत?

कबूल, या कवितेचा अनावश्यक थोडा वाढतोय अवकाश.

मेंढरापाठी फिरणाऱ्या मेंढपाळासारखाच
मी खूप फिरलोय त्याच्या सोबत
पाण्याशिवाय तुडवलाय मरडवाक प्रदेश
पाहिलीत
पुर्वापार दुष्काळाची शापित गावं.

तो अखंड वाहणाऱ्या वाऱ्यासारखा असायचा बडबडत
‘हे डोंगर कर्वतीने कापू नका
गाय-गुरांच्या पोटात,
प्लास्टिकच्या पिशव्या वाढवू नका
यातून नव्याने तयार होतील
नापिक जमिनीचे पर्जन्यछायी प्रदेश
जिथे पावसाळ्यात आकाश असते काळवंडलेले
ढग असतात लोंबकाळणारे पाण्याशिवायचे मोकळे
निसर्गाच्या तडाक्याने वल्हपटणारी माणसे
आणि आजार घेऊन येतात रात्री मुक्कामाला वारे.’

तिथं निर्जन एकाकी पांदीत
झाडीत अडकवलेली दुर्लक्षित प्रेतं.
तो म्हणाला,
‘लोकात संशय आहे,
ह्या आत्महत्या नाहीत
योजनाबद्ध मानवी नायनाटाचे सार्वत्रिक आहे सत्र.
नाहीतर कोण कशाला उधळून टाकेल
चौऱ्याऐंशी लक्ष योनीनंतर
‘माणूस’ म्हणून लाभलेले दुर्लभ सुंदर आयुष्य?’
पाहिलीत,
माणसं विमनस्क किंवडलेली
विस्तवांचे पायताण घालून पाण्यासाठी भटकणारी?
माणसं कोरड्या विहिरीसारखे खोल डोळे आत गेलेली,

धाप लागल्या कुत्र्यासारखी,
जीव टाकण्यासाठी सावल्या शोधणारी?

नदी कोरडी,
वाळूच्या फुटणाऱ्या लाह्या ज्यावर वाफेसारखी तरंगते
मृगजळाची तप्त माया
पक्षी परागंदा
झाडांनी रंग टाकून दिला होता हिरवा
पाण्यासाठी आळकी, जी आंब्याची झाडे
त्यांची केवळ पर्णहीन लाकडी कलेवरं उरलेली

'झळा ज्या लागल्या जीवा मुक्या जीव सृष्टीला ठाव्या
तुम्हाला काय हो त्याचे कुणाला काय सांगावे?'

अनुभवासाठी सुद्धा मला सहन होत नव्हता हा ताप
शेवटी वैतागून म्हणालो मी,
चिटपाखराचा लागत नाही जिथे सुगावा
लोकांपासून दूर या एकाकी वनात
कुठे दडलेत तुझे देव?
तो वारीपासून मागे राहिलेल्या वारकऱ्यासारखा-गुणगुणत,

'बोरीच्या या रानाला, ओ हिवराच्या ह्या वनाला
देव माझा जीव-जंतू पाखरांच्या रानाला'

अखेर उन्हं हलकी होताना आम्ही पोहचलो तिथं - बोरी, हिवर आणि पिप्रणीच्या
झाडीत दडलेल्या भग्न गावात

:ही कसली शेंदूर फासल्या दगडांची ओबडधोबड आरास?
त्यांना दगड म्हणू नका
आमच्यासाठी आहेत ते 'राखणे'
आमचे पूर्वज!
ज्यांनी जीवनाच्या खडतर प्रसंगी दिशा दाखवली,

भविष्य केले भाकीत आणि अरिष्टापासून रोखले
ते आहेत धरती मातेचे उपासक.
इथल्या हरएक दगडातून आम्ही जतन करून ठेवलीय त्यांची आठवण
हेच तर आहे आमचे सुंबरान!
गतकाळातील
जीवसृष्टीचे, प्राणीमात्रांचे
सुखदुःख आणि संघर्षाचे स्मरण
आज माझ्यातून वदवली जाणार आहे
आपल्या काळाची भाकनूक

:भाकनूक? काय असते ही भाकनूक?
तो फक्त माझे हात दाबून समजूतदार हासला.

तिथे आधीच जमा झाले होते लोक,
पेहरावातून त्यांच्या प्रत्येक रंगाची उधळण.
केस मोकळे सोडून घुमत होत्या स्त्रिया,
दगडाच्या मंदिरापुढे वाजत होते ढोल,
जसे प्रत्येकाच्या अंगात वाढलेले वारे.
या सर्व गोंधळातूनच आकाशात येत गेले
घाया-गजीचे नृत्य
हावभावातून कोणासाठी जोपासलीय त्यांनी अंतर्यामीची लीनता?
हवेत उडवीत भंडारा सुरू झाला येळकोट
आणि अचानक त्याने सोडवून घेतले हात
ढोलांच्या तालात तो उधळला वाऱ्यात,
माणसं त्याचीच पहात होती वाट
तो सांगणार होता आपल्या काळाची भाकनूक.

त्याने खूप करवून घेतले क्लेश आपल्या शरीरास
कचाकचा लिंबवं फोडली दातात,
पेटता कापूर गिळला पोटात,
आत्मा पिळवटून शब्दाशिवाय आवाज काढू लागला घशात,
लोक म्हणाले देवा झाडाचे करू नका हाल



काय असेल ते लिखित, बोलून टाका.
मग शरीराला देत आचके,
अक्षरश: किंचाळत, आकांत करीत थयथयाट
डोळे मिटून आकाशाकडे
उच्चारले त्याने वाक्य,

१९९७ साली पर्यावरण संदर्भात १७८देशांच्या प्रतिनिधींनी
तयार केलेल्या क्टा प्रोटोकॉलचा काही अंश

'आता हा मला सोसवत नाही ताप
कोण आपल्या निहित हितासाठी
धरित्रीच्या विनाशाची पाहतोय वाट?
कोण करतंय घशात जमीन गिळंकृत,
आभाळाला आणतोय काबूत?
कोण समुद्रात पेरून सुरूंग पाणी करतोय दूषित?
कोण विकतोय डोंगरमाळ,
नद्या-नाल्यांचा चालवलाय
कोणी लिलाव?
माणूस झाला जिथं अतिरिक्त,
कुठे चरतील माझी जनावरं आणि मेंढरं?
कोण फोडतोय माझ्या उदरात आटमबाँब?
कोणीतरी हे थोपवा.

अकारण वाढत असाल जर का ही उबावू उष्णता
तर प्रथम किनाऱ्यावरील शहरं जातील पाण्यात
जशी यादवांची एकवार द्वारका बुडाली सागरात
भोळ्या माझ्या सांबाच्या हिमालयाला लागेल आग
बर्फाची शिखरं पेटून उठतील
नद्यांना फुटेल पान्हा
सुबत्तेची शहर कोसळून पडतील
नंतर सर्वत्र वाढत जाईल उन्हाळा
नद्या पडतील कोरड्या
आटतील सरोवरं, आटतील धरणं
पृथ्वीच्या पोटात गडप होतील
उरल्या सुरल्या पाण्याचं अखेरचं तळ
मग कुठे भटकतील माझी पाखरं?
कशी तग धरून राहतील झाडं-झुडपं, जित्रापं?

मग माणूसच माणसाची विसरेल ओळख
बाप लेकीला, भाव भैनीला, नवरा बायकोला
बाजारात विकेल
प्रथम लहानांची लावतील वाट
नंतर विष कालवून घेतील आपल्या ताटात.
म्हणून
पृथ्वीच्या मालकीची वावडी उठवणाऱ्या
त्या वैऱ्यांना थोपवा
नाहीतर अटळ
अटळ आहे अनर्थ'

थकून शेवटी पडला भूमीवर
जसे कुठल्या वाऱ्याने झाडाला सोडून द्यावे
आणि 'येरळेच्या' पात्रात पावसाळ्यात
पुराशिवाय वाळूतून पाणी फुटावे तसे
समूहाच्या मुखातून आपसुक बोल आले,
'सुंबरान मांडलं गा
सुंबरान मांडलं.......'